# जीवनात यशस्वी होण्यासाठी ज्ञानशक्तीचा उपयोग करा : अभिनेता बोमन इराणी

## मुकुल माधव विद्यालयाचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात; विद्यार्थ्यांचे बहारदार कार्यक्रम

रत्नागिरी :- प्रसिध्दीच्या मागे धावण्यापेक्षा आपल्या मुलांना सक्षम बनवा, जीवनात यशस्वी होण्यासाठी ज्ञान हीच शक्ती आहे, असे उद्‌गार प्रसिध्द अभिनेता बोमन इराणी यांनी काढले. मुकुल माधव फाऊंडेशनच्या गोळप येथील मुकुल माधव विद्यालयाच्या तिसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विशेष अथिती म्हणून ते बोलताना पुण्याच्या बिशप हायस्कूलचे प्राचार्य फ्रँक फ्रीज यांनी फिनोलेक्स उद्योग समूहाच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाची तारीफ केली. इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पुणेचे समूह संचालक चेतन वाकळकर यांनी आगामी काळातील ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेतील शिक्षणाचे महत्व विशद करुन शाळेबद्दल गौरवोद्‌गार काढले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व विद्यालय गीताने झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर हंसिका छाब्रिया व शाळेच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. गायत्री छाब्रियांनी



मुकुल माधव विद्यालयाच्या तिसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटन समारंभाप्रसंगी उपस्थित अभिनेता बोमन इराणी, सोबत आमदार उदय सामंत, शिक्षणाधिकारी चंद्रकांत गावडे, कोल्हापूरचे परिवहन अधिकारी राजेंद्र मदने, राजाभाऊ लिमये, व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, उपजिल्हाधिकारी अजित पवार, प्रांताधिकारी एस.आर. बर्गे, विशिन व विजय गुरनानी, मनिषा जेठा, साबिना संघवी, विद्या तेजुजा, रोशन इराणी, रसिका वाकळकर, ॲड. रुची महाजनी, फिनोलेक्सचे व्यवस्थापकीय संचालक एस.एस. धानोरकर, संचालक एस.एस.मठ, कंपनी सेक्रेटरी अनिल अत्रे, डॉ.दिलीप मोरे, डॉ. रमेश चव्हाण, मंगेश साळवी आदि.

पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रनिता वालावलकर यांनी फाऊंडेशनच्या कार्याचा परिचय करुन दिला तर मुख्याध्यापक उल्हास सप्रे यांनी अहवाल वाचन केले. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया यांनी शिक्षणक्षेत्राप्रती असलेल्या बांधिलकीचा पुनरुच्चार करुन शाळेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी पाहुण्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. याशिवाय आमदार उदय सामंत, शिक्षणाधिकारी चंद्रकांत गावडे, कोल्हापूरचे परिवहन अधिकारी राजेंद्र मदने, राजाभाऊ लिमये यांनीहि आपली मनोगते व्यक्त केली.

चित्रकला, फॅन्सी ड्रेस, एकल नृत्य, किल्ला बांधणे तसेच अभ्यासातील नैपुण्याबद्दल विद्यार्थ्यांना पदके व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. फाऊंडेशनतर्फे मदत करण्यात आलेल्या बालरुग्णांना हेरिटेज हाऊस, पुणेचे चेअरमन अजित जगताप, बाल दंतरोगतज्ज्ञ डॉ. आलोक पटेल यांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आल्या. या कार्यक्रमाला फाऊंडेशनच्यावतीने व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, उपजिल्हाधिकारी अजित पवार, प्रांताधिकारी एस.आर. बर्गे, विशिन व विजय गुरनानी, मनिषा जेठा, साबिना संघवी, विद्या तेजुजा, रोशन इराणी, रसिका वाकळकर, ॲड. रुची महाजनी, फिनोलेक्सचे व्यवस्थापकीय संचालक एस.एस. धानोरकर, संचालक एस.एस.मठ, कंपनी सेक्रेटरी अनिल अत्रे, डॉ.दिलीप मोरे, डॉ. रमेश चव्हाण, मंगेश साळवी आदि होते.

विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात पुण्याचे भरत जंगम व प्रथमेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तबलावादन केले तर जावेद मिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कराटे प्रात्यक्षिक केले. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी मेरी बेंजामिन व वैष्णवी रिसबूड यांच्या मार्गदर्शनानुसार इंग्रजीतून संगीतमय नाटक सादर करुन सर्वांची मने जिंकली. यानंतर गायत्री छाब्रिया व सफिना नाखवा यांनी आभार प्रदर्शन केले. माधुरी मांजरेकर व प्रिया बिल्खा यांनी सूत्रसंचालन केले. राधा करमरकर व वैष्णवी रिसबूड यांनी गायिलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थी व शिक्षक यांनी विज्ञान व कला प्रदर्शन आयोजित केले आहे.